**पुणे विद्यापीठ**
सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. पंडीत एन. शेळके
(एम.एस्सी., पीएच्.डी.)
संचालक : विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.विकमं/२०१२–१३/९२ दिनांक : ०३/०७/२०१२

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये /
मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या सभेबाबत....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधून नियुक्त करण्यात आलेले विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची सभा शुक्रवार, **दिनांक २० जुलै, २०१२ रोजी, सकाळी १०.३० वाजता, संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेसाठी खालीलप्रमाणे विषय असतील.

१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना व विशेष मार्गदर्शन योजना मान्यता. देणे व कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा ॲडव्हान्स वितरीत करणे.
२. शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मधील विविध उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.
३. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या इतर योजना या शैक्षणिक वर्षात राबविणेबाबत मार्गदर्शन करणे.

आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस उपस्थित राहणेबाबत सूचित करावे तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी आपला प्रतिनिधी पाठवू नये, ही विनंती.

कळावे,

आपला,

3/7/2012

(डॉ. पंडित एन. शेळके)
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

(टिप : **या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०१२–१३/००८, दि. ०६/०६/२०१२ नुसार** जर आपल्या महाविद्यालयाने कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना व इतर उपक्रमांचे प्रस्ताव सादर केलेले नसतील, त्यांनी सदरचे प्रस्ताव त्वरित सादर करावेत. जेणेकरुन या प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.)